गुणी मांजर

“नेमुरी नेको” ची जपानी लोककथा

लेखक: कोको निशिझुका चित्र : रोझेन लीत्झींगर

मराठी अनुवाद:तृप्ती कर्णिक

खूप वर्षांपूर्वी समुद्रकिनाऱ्याजवळ एका गावात घडलेली ही गोष्ट आहे. एके दिवशी पांढरी, चिखलाने माखलेली एक मांजर योहेईच्या दारात आली. योहेई खूप गरीब होता पण तरी त्याने ह्या भटक्या मांजरीला प्रेमाने खायला दिले. खाल्यावर ती निघून गेली. नंतर योहेईचे बाबा खूप आजारी पडले. बाबांची काळजी घ्यायला घरी थांबणे गरजेचे होते. त्यामुळे आता घर कसे चालवायचे ह्या विचारात तो होता. पण त्या इवल्या पांढऱ्या मांजरीला योहेईची मदत लक्षात होती. ती परत आली आणि आपला पंजा वापरून तिने योहेईच्या मदतीची परतफेड केली.

गुणी मांजर

जपानी लोक कथा



खूप वर्षांपूर्वी योहेई नावाचा मुलगा आपल्या वडिलांसोबत समुद्रकिनाऱ्यालगतच्या एका गावात राहत होता. रोज सकाळी सूर्याचे पहिले किरण समुद्रावर पडले की लगेच तो बंदरावर मासे विकत घेण्यासाठी निघायचा. ते मासे कावडीत भरून तो दारोदरी मासे विकायला जायचा. योहेई खूप मेहनत घ्यायचा पण त्यातून पुरेसे पैसे मिळायचे नाही.

त्याचे वडील आजारी पडले. त्यामुळे त्यांची औषधे विकत घेण्यासाठी तो आणखीन मेहनत करू लागला. पण एकावेळी कावडीत तो फक्त दोन टोपल्या मासे घेऊ शकायचा. ह्यापेक्षा जास्त मासे उचलता येत नाही ह्याचे त्याला खूप वाईट वाटे.



एक दिवशी रात्री खूप पाउस पडत होता. योहेई घरात स्वयंपाक करत होता. अचानक दारावर टकटक झाली. योहेईने दार उघडले. पाहतो तर काय दारात थंडीने कुडकुडलेली मांजर. तिचे पांढरेशुभ्र केस चिखलाने माखले होते. गरीब आवाजात म्याँव म्याँव करत जणू काही ती “मी आत येऊ का?” अशी विनवणी करत होती.

“गरीब बिच्चारी मांजर,” योहेईने तिला प्रेमाने उचलून घेतले. टॉवेलने तिचे अंग कोरडे केले. त्याने आधी वडीलांना जेवायला दिले. उरलेले अन्न खरेतर त्याच्यासाठी अपुरे होते. तरीही त्याने आपल्या ताटलीतील अर्धा भात आणि अर्धा मासा मांजरीला खाऊ घातला.

जेवण झाल्यावर मांजरीने योहेईच्या मांडीवर उडी मारली आणि लाडाने अंग घासू लागली. अर्धपोटी असल्याने योहेईच्या पोटातून आवाज येत होता पण तरीसुद्धा मांजर करत असलेल्या लाडाने त्याला आनंद झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी ती मांजर निघून गेली.

त्यानंतर तीन दिवस उलटले. योहेई गावात मासे विकत असताना त्याचा मासा नावाचा शेजारी पळत पळत आला आणि म्हणाला, “योहेई, पटकन घरी चल. तुझ्या बाबांना खूप ताप चढला आहे.”

माशानी भरलेली कावड तशीच खांद्यावर घेऊन योहेई घाईघाईने घरी परतला. तो आला तेव्हा मांजर दारात उभी होती. पण तिकडे लक्ष न देता तो वडिलांकडे धावला. त्यांच्या कपाळावर थंड पाण्याच्या घड्या ठेवल्या. त्यांना थोडे बरे वाटल्यावर योहेईचे लक्ष माशांकडे गेले. “अरे देवा! मी काय करू? आज मला मासे विकायला बाहेर जाता येणार नाही. हे सगळे मासे खराब होऊन जातील,” तो उसासा टाकत म्हणाला.

अचानक कुणीतरी दार वाजवले. योहेई बाहेर येऊन पाहतो तर काय! सुंदर किमानो घातलेली एक तरुण स्त्री!

“नमस्कार, मी आपली काय मदत करू शकतो?” ,योहेईने नम्रपणे विचारले.

“तू मासे विकतो का?” माशाच्या टोपलीकडे पाहत तिने विचारले. “गंमतच आहे! एक मांजर मासेवाल्याकडे गिऱ्हाईक पाठवतेय,” किमानोच्या बाहीने तोंड झाकून ती हळूच हसली.

“काय?,” योहेईने गोंधळून विचारले.

“ती पांढरी मांजर तुमची आहे का? मी शिवणक्लास करून निघाले होते. माझ्याकडे बघून मांजरीने म्याँव केले. काही पावले चालल्यावर ती मागे वळली आणि एक पंजा वर करून जणू काही इकडे ये असे म्हणत होती. ती इतकी गोड आहे की मी नकळत तिच्या मागे मागे आले.



योहेई चकित झाला. त्याने जेव्हा पहिल्यांदा मांजर घरी आली होती तेव्हाचा प्रसंग सांगितला.

“कसली विलक्षण मांजर आहे!” ती तरुणी म्हणाली. “नक्कीच इथले मासे विकत घेण्यासाठी ती मला घेऊन आली आहे!” मग तिने तीन मासे बांधून द्यायला सांगितले. योहेईने त्या बाईला वाकून धन्यवाद म्हटले.

त्यानंतर लगेचच दारावर पुन्हा टकटक झाली. त्याने दार उघडले तर दारात एक मोठी व्यक्ती उभी होती. जवळच्या शहरात त्यांच्या मालकीचे मोठे दुकान होते.

“नमस्कार सर आज तुम्ही इथे कसे काय आला आहात ?,” योहेईने विचारले. एक श्रीमंत माणूस आपल्या गरीबाच्या घरी का बरे आला असावा असा प्रश्न त्याला पडला.

“अच्छा, तर ती तुझी मांजर आहे!” ती व्यापारी म्हणाली त्यांना खूप नवल वाटले होते.

“तिने मला नक्की माशांवर बोलताना ऐकले असावे.”

“काय? मासे?” योहेईने विचारले.

“आज सकाळी माझ्या सुनेला बाळ झाले. नातू झाला त्या आनंदाप्रीत्यर्थ मी एक मेजवानी आयोजित केली आहे. त्यासाठी मला दहा मोठे रावस हवेत. मासेवाला शोधण्यासाठी मी घराबाहेर पडलो तर लगेचच ही पांढरी मांजर माझ्या मागे आली. तिने उजवा पंजा वर करून म्याँव केले,” त्याने हात उंचावून मांजरीची नक्कल केली. “मला तिच्या मागे मागे येण्याचा मोह आवरला नाही. आणि आता मी तुझ्यासमोर उभा आहे!”

योहेई खूप भारावून गेला. त्याने त्या व्यापाऱ्याला आपल्या वडिलांच्या आजारपणाबद्दल व मांजर पहिल्यांदा घरी आली तेव्हाच्या प्रसंगाबाद्दल सगळे काही सांगितले.



“अरे व्वा! म्हणजे ही खास तुझ्याकडे गिऱ्हाईक घेऊन येते तर!” व्यापारी म्हणाला. “उपकाराची परतफेड करणाऱ्या मांजरीबद्दल मी आतापर्यंत कधीच ऐकले नव्हते. आजकाल तर माणसेदेखील ऋण विसरून जातात.” त्या व्यापाऱ्याने खिशातून चांदीचे नाणे बाहेर काढले आणि त्याच्याकडील सर्व मासे विकत घेण्याची इच्छा व्यक्त केली.

योहेईने त्या व्यापाऱ्याचे खोलवर वाकून पुनःपुन्हा आभार मानले.

मांजरीमुळे योहेईकडे गिऱ्हाईकांची रांग लागली. त्याचे सगळे मासे दुपारपर्यंत संपले देखील. सगळ्यांना मांजरीचे खूप कौतुक वाटले. उद्यापासून आम्ही रोज तुझ्याकडेच मासे घ्यायला येत जाऊ असे त्यांनी सांगितले. आता योहेईला मासे विकता विकता आपल्या आजारी वडिलांकडे लक्ष ठेवता येणे सोपे झाले.

त्या दिवसपासून ती पांढरीशुभ्र मांजर योहाईच्या घरी राहू लागली. मासे विकत घेण्यासाठी लोकांना ती योहेईकडे बोलावून आणायची. निव्वळ मांजरीला बघण्यासाठी देखील लांबून लांबून लोक येऊ लागले. योहेईचे आता भरपूर मासे विकले जाऊ लागले. त्यामुळे लवकरच त्याने स्वत:च्या मालकीचे दुकान सुरु केले. चांगले औषधोपचार मिळाल्यामुळे त्याचे वडील आजारपणातून बाहेर पडले. इतर व्यापारीही म्हणू लागले की योहेईसारखी मांजर आपल्यालाही मिळाली तर किती चांगले होईल असे.

अशाप्रकारे जपानमध्ये मांजर भाग्याचे मानले जाऊ लागले. काहीजण योहाईच्या पंजा वर केलेल्या मांजरीसारख्याच चिनी मातीच्या मांजरी बनवू लागले. सगळे दुकानदार तशी मांजर आपल्या दुकानात ठेऊ लागले. तसे केल्याने जुनी गिऱ्हाईक टिकून राहतील व भरपूर नवीन गिऱ्हाईके येतील अशी त्यांची श्रद्‌धा आहे.



जर तुम्ही कधी जपानमध्ये गेलात किंवा अमेरिकेत एखाद्या एशियन दुकानात गेलात, तर तिथे अशी पंजा वर केलेली मांजर ठेवली आहे का हे नक्की बघा. तुम्हाला आता माहीत आहेच ती तिकडे का ठेवली आहे ते!

समाप्त